**Reminder/Time Bound**

# क्र. सांख्यिकी/एम.आय.एस.९८/०६/२०१३

**परिपत्रक :-**

विषय : महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाची
मॅनेजमेंट इंफॉरमेशन सिस्टीम (एम.आय.एस.)
तयार करणेबाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र. सांख्यिकी/१८३/२०१३,
दिनांक ११ जानेवारी, २०१३,
२) क्र. सांख्यिकी/१८४/२०१३, दिनांक ११ जानेवारी, २०१३

विद्यापीठ विभाग प्रमुख व प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये (विना अनुदानित) यांचे लक्ष वरील संदर्भिय परिपत्रकांकडे वेधण्यात येते.

सदर परिपत्रकांनुसार त्यांना विभागातील/महाविद्यालयामधील २०१२-१३ या शैक्षणिक वर्षातील एम.आय.एस. (मॅनेजमेंट इन्फॉरमेशन सिस्टीम) माहिती उच्च शिक्षण संचालनालयाच्या विहीत नमुन्यात पाठविण्याची विनंती करण्यात आली होती. परंतु, अद्याप त्यांच्या महाविद्यालयाची मुळ प्रत (Hard Copy) CD सह माहिती प्राप्त झालेली नाही.

याबाबत पुन्हा कळविण्यात येते की, सन २०१२-१३ मॅनेजमेंट इंफॉरमेशन सिस्टीम (एम.आय.एस.) ची मुळ प्रत (Hard Copy) CD सह माहिती वेळेवर न पाठविल्यामुळे महाविद्यालयाचे/विभागाचे नांव माहिती प्राप्त न झालेल्या यादीमध्ये नोंद झालेले असून याबाबत सहसंचालक (उच्च शिक्षण) मुंबई विभाग व मा. कुलगुरूंनी तीव्र नाराजी व्यक्त करून स्मरणपत्र पाठविण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

तरी याबाबतची गांभीर्याने दखल घेऊन दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजी सदरची माहिती तातडीने दिनांक २४ जानेवारी, २०१३ पूर्वी विहित नमुन्यात पाठविण्यात यावी. तसेच सदर माहितीसह पदवीदान सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई येथे सकाळी ११.०० वाजता बैठकीस उपस्थित रहावे. अन्यत: याबाबत योग्य त्या प्राधीकरणांकडे महाविद्यालयाचे/विभागाचे नांव कळविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सही/-

कुमार खैरे
(कुलसचिव)

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २२ जानेवारी, २०१३

**टिपणी :- ज्या विभागांनी/महाविद्यालयांनी माहिती पाठविली असेल त्यांनी सदर परिपत्रक दुर्लक्षित करावे.**

प्रत : १) विद्यापीठ विभाग प्रमुख व प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये. (विना अनुदानित)
२) सहसंचालक (उच्च शिक्षण) मुंबई विभाग, एलफिस्टन तंत्रविद्यालय आवार,
महापालिका मार्ग, मुंबई - ४००००१.